# मोबाईल, इंटरनेटच्या चुकीच्या वापरामुळे सायबर गुन्

## हॅपी अवर माध्यमिक विद्यालयात सायबर सुरक्षा विषयावर कार्यशाळा

22/10/2023

▸ सकाळ वृत्तसेवा



अकोला : कार्यशाळेत उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सायबर वॉरियर्स.

अकोला, ता. २१ : हॅपी अवर माध्यमिक विद्यालय येथे 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' या विषयावर विद्यार्थ्यांसाठी एकदिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेत शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालयाच्या सायबर वॉरियर्स तेजस्विनी राठोड आणि भाग्यश्री दोड यांनी विद्यार्थ्यांना मोबाईल आणि इंटरनेटच्या चुकीच्या वापरामुळे सायबर गुन्हे मोठ्या प्रमाणात वाढत आहेत या विषयी महत्त्वपूर्ण माहिती सांगितली.

मोबाईलचा अती वापर टाळावा, सतत मोबाईल गेम्स खेळल्यामुळे कसे वाईट परिणाम होतात, व्हॉट्सप, इंस्टाग्राम, फेसबुक, एटीएम, व्हॉईस क्लोनिंग, फेक वेबसाइट्सच्या माध्यमातून कशी फसवणूक होते आणि या पासून आपण कसे सुरक्षित राहावे या विषयी सविस्तर मार्गदर्शन यावेळी त्यांनी केले.

सेटिंग मधून टू स्टेप व्हेरिफिकेशन करावे, सेक्युरीटी सर्टिफिकेट असलेल्याच वेबसाईटला विझिट करावे, अशा सुरक्षा टिप्स विद्यार्थ्यांना त्यांनी सांगितल्या आणि माहितीपत्रक वाटप केले. कार्यशाळेत विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन करून मोबाईलचा योग्य उपयोग करण्यासाठी शपथ दिली.

ही कार्यशाळा शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालय अकोलाचे प्राचार्य डॉ. जे. एम. साबू, समन्वयक डॉ. हरिदास खरात यांच्या मार्गदर्शनाखाली, क्विक हिल फाउंडेशन पुणे आणि महाराष्ट्र सायबर सेल मुंबई यांच्या सहयोगाने आणि विद्यालयाचे प्राचार्य श्री अभिलाष बजनेरे यांच्या परवानगीने आयोजित केली होती. शिक्षक व शिक्ष कर्मचारी आणि विद्यार्थी य उपस्थित होते.

Akola Edition
Oct 22, 2023 Page No. 1
epaper: Sakal vrutseva.com